पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. २१ दिनांक १७/०५/२०२४**

# अवैधरित्या दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून कारवाई

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच सर्व पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी यांची बैठक घेऊन अवैध धंदे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या अनुषंगाने योग्य त्या कारवाया करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने दि.१६/०५/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई पोहवा/१०२० कपिल नेमाडे, पोहवा/९३७ संदीप सरदार, पोहवा/३२६ संजय धांगडा, पोअं/२९६ बजरंग अमनवाड सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर असे वरीष्ठांचे आदेशाने पालघर जिल्ह्यामध्ये अवैध धंद्यावर कारवाई करीता तलासरी पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत असताना त्यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, तलासरी बोबापाडा (प) ता. तलासरी, जि. पालघर येथे मोकळ्या जागेमध्ये बोलेरो पिकअप क्र. एमएच.-४८-सी क्यु-०४०९ मधुन अवैद्धरित्या विक्री करीता वाहतुक करुन आणलेली दमण बनावटीच्या विविध कंपनीचे दारुचे बॉक्स हे बोलेरो पिकअप क्र. एमएच.१८ बीजी ४९३१ मध्ये खाली करीत आहेत.

मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई व त्यांचे पथकाने वरील नमुद ठिकाणी छापा टाकला असता बोलेरो पिकअप मधुन दारुचे बॉक्स उतरवताना दिसणारे ३ अनोळखी इसम व त्यांना मदत करणारे इतर इसम हे जंगलाचा फायदा घेवून पळून गेले. नमुद ठिकाणी वरील क्रमांकाचे दोन पिक अप व एक सफेद रंगाची मारुती सुझुकी स्विफ्ट कार क्र. एमएच-०६-ए एस-२८९१ असे वाहने मिळून आली. सदर वाहने जप्त करून वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये खालील वर्णनाचा मुद्देमाल मिळून आलेला आहे.

१) १,१०,८८०/- रुपये किंमतीचे रॉयल चॅलेंज फायनेस्ट प्रिमीयम व्हिस्कीचे एकुण २८ बॉक्स, एका बॉक्समध्ये ७५० मि. ली. च्या एकुण १२ काचेच्या सिलबंद बाटल्या. प्रत्येकी ३३०/- रुपये किंमतीची. बॅच नं. 0108/L6.30.03.2024 for sale in U. T. dadara and nagarhaveli and daman and div only असे लिहिलेले.

२) १,६३,२००/- रुपये किंमतीचे रॉयल चॅलेंज फायनेस्ट प्रिमीयम व्हिस्कीचे एकुण ४० बॉक्स, एका बॉक्समध्ये १८० मि. ली. च्या एकुण ४८ काचेच्या सिलबंद बाटल्या. प्रत्येकी ८५/- रुपये किंमतीची. बॅच नं. 0002/L3.24.04.2024 for sale in U. T. dadara and nagarhaveli and daman and div only असे लिहिलेले.

३) ३८,४००/- रुपये किंमतीच्या इंम्पेरीयल ब्लु हॅण्ड पिक्ड ग्रेन व्हिस्कीचे एकुण १० बॉक्स, एका बॉक्समध्ये १८० मि.ली.च्या एकुण ४८ काचेच्या सिलबंद बाटल्या. प्रत्येकी ८०/- रुपये किंमतीची. बॅचनं. FL/2023-2024/0133 for sale in U. T. dadara and nagarhaveli and daman and div only असे लिहिलेले.

४) १९,२००/- रुपयेकिंमतीच्या मॅक्डोव्हेल नं. १ रिझर्व व्हिस्कीचे एकुण ५ बॉक्स, एका बॉक्समध्ये १८० मि.ली. च्या एकुण ४८ काचेच्या सिलबंद बाटल्या. प्रत्येकी ८०/- रुपयेकिंमतीच्या. बॅचनं. 0001/12.29.04.2024 for sale in U. T. dadara and nagarhaveli and daman and div only असे लिहिलेले.

५) १,२२,४००/- रुपये किंमतीच्या ऑलसिझन गोल्डन कलेक्शन रिझर्व व्हिस्कीचे एकुण ३० बॉक्स, एका बॉक्समध्ये १८० मि. ली.च्या एकुण ४८ काचेच्या सिलबंद बाटल्या. प्रत्येकी ८५/- रुपये किंमतीच्या. बॅचनं. 03/02.05.2024 for sale in U. T. dadara and nagarhaveliand daman and div only असे लिहिलेले.

६) ७८,०००/- रुपये किंमतीच्या ऑलसिझन गोल्डन कलेक्शन रिझर्व व्हिस्कीचे एकुण २० बॉक्स, एका बॉक्समध्ये ७५० मि. ली.च्या एकुण १२ काचेच्या सिलबंद बाटल्या. प्रत्येकी ३२५/- रुपये किंमतीच्या. बॅच नं. 120/15.03.2024for sale in U. T. dadara and nagarhaveli and daman and div only असे लिहिलेले.

७) १०,००,०००/- रुपये किंमतीची एक सफेद रंगाची महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. एमएच.-४८-सीक्यु-०४०९ त्याचेवर काळ्या रंगाची ताडपत्री असलेली.

८) १०,००,०००/- रुपये किंमतीची एक सफेद रंगाची महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. एमएच.-१८-बीजी- ४९३१ त्याचेवर हिरव्या रंगाचे कापड असलेले.

९) ५,००,०००/- रुपये किंमतीची एक सफेद रंगाची मारुती सुझुकी स्विफ्ट कार क्र. एमएच-०६-एएस-२८९१

असा ११६६.४ लिटर दारू किंमत ५,३२,०८० रु व वाहणांची किंमत २५,००,००० रु असा एकुण ३०,३२,०८०/- रुपये किंमती चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वरील पळून गेलेले ३ अनोळखी इसम व त्यांना मदत करणारे इतर इसम यांचेविरुध्द तलासरी पोलीस ठाणे येथे ।।। १४८/२०२४,महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(अ)(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा पुढिल तपास हा पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, पोलीस निरीक्षक श्री. अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई पोहवा/१०२० कपिल नेमाडे, पोहवा/९३७ संदीप सरदार, पोहवा/३२६ संजय धांगडा, पोअं/२९६ बजरंग अमनवाड सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.